मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दि. 13 ऑगस्ट 2024 | पान- 1

# महाविकास आघाडीचा ‘सेल्फ गोल’

## लंडनमधील 200 कोटींच्या हॉटेलचा आरोप भोसरीकरांच्या जिव्हारी : पक्षीय राजकारणात गाववाले मंडळीचा स्वाभिमान दुखावल्याची भावना

**पिंपरी | प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने पिंपरी-चिंचवडमधील भोसरी विधानसभा मतदार संघातील राजकीय वातावरण तापले आहे. आरोप-प्रत्यारोपांची ‘सोशल मीडिया’वर धुरळा सुरू असतानाच महाविकास आघाडीचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या एका वक्तव्यामुळे मविआचा ‘सेल्फ गोल’ झाला आहे.

सध्या अजित पवार गटात असल्याचा दावा करणारे माजी आमदार विलास लांडे यांच्या शैक्षणिक संस्थेसमोरील रस्त्यावर राष्ट्रवादी शरद पवार गटाची ‘शिव स्वराज्य’ सभा झाली. ही सभा “महाराष्ट्राच्या स्वाभिमानाची” असल्याचा दावा सेलिब्रिटी प्रचारप्रमुख खासदार डॉ. अमोल कोल्हे आणि पक्षाने दावा केला. महाराष्ट्राच्या स्वाभिमानासाठी काढलेल्या यात्रेत आणि सभेत मात्र भोसरीकर किंबहुना पिंपरी-चिंचवडकरांचा स्वाभिमान दुखावल्याची भावना निर्माण झाली आहे.

“भोसरीतील एका प्रतिष्ठित व्यक्तीचे लंडनमध्ये २०० कोटी रुपयांचे हॉटेल आहे..” असा जाहीर आरोप करीत हा पैसा कुठून आला... असा अप्रत्यक्ष सवाल खासदार कोल्हे यांनी जाहीरपणे उपस्थित केला. आरोपाचा रोख निश्चितच आमदार महेश लांडगे यांच्याकडे होता. त्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आणि लांडगे यांचे हॉटेल आहे किंवा नाही? याबाबत शहरात चर्चा सुरू झाली.

वास्तविक, पिंपरी-चिंचवडची राजकीय वाटचाल पाहता शहरातील गावकी-भावकी आणि स्थानिक राजकारणामध्ये शहराबाहेरील किंवा राज्याच्या नेतृत्त्वाने अवास्तव लक्ष घातले की स्थानिक भूमिपुत्र चमत्कारिक रित्या पक्षभेद विसरुन एक होतात, ही वस्तुस्थिती आहे. प्रा. रामकृष्ण मोरे यांच्यापासून अगदी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यापर्यंत अनेक नेतृत्त्वांना हा अनुभव आला आहे. स्थानिक अस्मितेला हात घातला की, भूमिपुत्रांमधील स्वामिमान जागा होतो. “नको बारामती... नको भानामती.. आता पिंपरी-चिंचवडची धुरा राम-लक्ष्मणाच्या हाती” ही २०१७ मध्ये झालेली गर्जना त्याचे मूर्तरुप होती. आगामी किमान २५ वर्षेतरी पिंपरी-चिंचवडचे राजकारण गावकी-भावकी आणि भूमिपुत्रांच्या अवती-भवतीच फिरेल, असे राजकीय जाणकार सांगतात.



### महाविकास आघाडीला फटका

» महाविकास आघाडीकडून इच्छुक असलेले अजित गव्हाणे यांनी “भोसरीचा बकालपणा वाढला... भोसरीत राहणाऱ्या युवकांना नोकरी दिली जात नाही.. भोसरी बदनाम झाली आहे...” अशी टीका जाहीरपणे केली होती. त्यावेळीसुद्धा स्थानिक प्रतिष्ठीत व्यक्तींना ही बाब रुचलेली नाही. याबाबत त्यांनी खासगीमध्ये “राजकारणापायी भोसरीचे किंवा शहराचे नाव बदनाम करु नका..” असा सबुरीचा सल्लाही दिल्याचे सांगितले जाते. याउलट, आतापर्यंत माजी आमदार ज्ञानेश्वर लांडगे, स्व. आमदार लक्ष्मण जगताप, माजी आमदार विलास लांडे यांच्यानंतर दुसऱ्या फळीत कोणताही स्थानिक नेत्याने राजकीय आरोप-प्रत्यारोप करताना गाववाल्यांच्या स्वाभिमानाला ठेच पोहोचेल, असे वक्तव्य केलेले नाही. खासदार अमोल कोल्हेंच्या वक्तव्यामुळे “आता बात भोसरीकरांच्या धंदा-पाण्यावर आणि स्वाभिमानावर आली...” त्यामुळे सर्वपक्षीय गाववाले यांच्यात नाराजीचा सूर असून, त्याचा फटका महाविकास आघाडीला बसण्याची शक्यता आहे, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

### अमोल कोल्हेंचा वार, महेश लांडगेंचा पलटवार...!

» “भोसरीतील प्रतिष्ठीत व्यक्तीचे लंडनमध्ये २०० कोटींचे हॉटेल आहे” असा आरोप मविआचे खासदार अमोल कोल्हे यांनी जाहीरपणे केला. त्यांचा रोख आमदार महेश लांडगे यांच्याकडेच होता. यावर लांडगे यांनी मोजक्या शब्दांत ‘चेकमेट’ केला. आमदार महेश लांडगे म्हणाले की, “एखाद्या भोसरीकराचे किंवा पिंपरी-चिंचवडकराचे २०० कोटीचे हॉटेल लंडनमध्ये असेल, तर ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. खासदार साहेबांचा रोख माझ्याकडे असेल... तर त्यांनी पुराव्यानिशी सिद्ध करावे. मी आजच्या आज राजकारणातून निवृत्ती घेतो... पदाचा राजीनामा देतो... पण, केलेले आरोप सिद्ध करता आले नाहीत, तर खासदार काय करणार हेसुद्धा त्यांनी जाहीर करावे.” त्यामुळे खासदार कोल्हे यांना केलेल्या आरोपाची सिद्धता द्यावी लागणार हे निश्चित झाले. विशेष म्हणजे, लोकसभा निवडणुकीत अमोल कोल्हे यांना भोसरीमध्ये सुमारे १० हजार मते कमी आहेत. या निवडणुकीच्या प्रचारात एकदाही आम्ही कोल्हेंवर टीका केली नाही. मी माझ्या नेत्यांचे विचार मांडत होतो. महायुतीच्या उमेदवाराचा प्रचार केला. त्यामुळे निवडणूक विकासाच्या मुद्यावर आणि आपण सत्तेत असताना का प्रश्न सोडवले नाही? अशा अजेंड्यावर व्हावी, असे सूचक संदेशही लांडगे यांनी एका मुलाखतीमध्ये बोलताना दिला आहे.

---

# राष्ट्रवादीने पिंपरीची जागा सोडावी रिपाइंची आग्रही मागणी, पिंपरी विधानसभा मतदारसंघावर दावा

## पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांची भेट घेऊन ही मागणी त्यांच्याकडे मांडणार आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

महायुतीच्या जागा वाटपात अपवादात्मक परिस्थितीत काही ठिकाणच्या जागा बदलण्याचे संकेत आहेत. पिंपरी विधानसभा निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाच्या अपक्ष उमेदवाराला मिळालेली मते लक्षात घेत, जागा वाटपात महायुतीने ही जागा रिपब्लिकन पक्षाला सोडवी, या मागणीसाठी रिपब्लिकन पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते कमालीचे आग्रही आहेत.

याबाबत लवकरच पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांची भेट घेऊन ही मागणी त्यांच्याकडे मांडणार आहेत. आरपीआयचा आग्रह या जागेबाबत वाढत असल्याने पिंपरी विधानसभा मतदारसंघाच्या जागेवरुन महायुतीत मिठाचा खडा पडण्याची शक्यता दिसत आहे.

शहर कायकारिणीच्या पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र वाटपाच्या कार्यक्रमादरम्यान पार पडलेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे.



### अन्य पक्षाच्या पालख्या वाहणार नाही

» शहराध्यक्ष कुणाल वाव्हळकर यांनी आता अन्य राजकीय पक्षाच्या पालख्या आम्ही वाहणार नाही. या मतदार संघात आमची ताकद आहे, त्यामुळे हा मतदार संघ आम्हाला दिल्यास, पक्षाचा पहिला आमदार आम्ही विधानसभेत पाठवू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### खासदारांनी पाठिशी उभे राहावे

» चंद्रकांता सोनकांबळे म्हणाल्या की; पिंपरीत रिपब्लिकन पक्षाची मोठी ताकद आहे. कार्यकर्त्यांच्या पाठबळावर आम्ही या मतदार संघात लक्षणीय मते घेतली आहेत. त्यामुले आमचा या मतदार संघावर दावा आहे. महायुतीच्या घटक पक्षातील तत्कालीन आमदार स्व. लक्ष्मण जगताप यांचा आम्हाला पाठिंबा होता. लोकसभेतील कामाची पावती म्हणून खासदार श्रीरंग बारणे यांनी आमच्या पाठिशी ठामपणे उभे रहावे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

# महापालिका तोंडघशी, दोन हजार खड्डे बुजवल्याचं स्वत:च केलं जाहीर!

## पावसाळ्यापूर्वी सर्व खड्डे बुजवले आहेत, असे सांगत रस्त्यांवर खड्डे नसल्याचा दावा करणाऱ्या पुणे महापालिकेवर गेल्या 15 दिवसांत दोन हजारावर खड्डे बुजवल्याचे जाहीर केले

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील रस्ते अतिशय चांगले आहेत. पावसाळ्यापूर्वी सर्व खड्डे बुजवले आहेत, असे सांगत रस्त्यांवर खड्डे नसल्याचा दावा करणाऱ्या पुणे महापालिकेवर गेल्या १५ दिवसांत दोन हजारावर खड्डे बुजवल्याचे जाहीर करण्याची नामुष्की ओढवली.

शहरात गेल्या १५ दिवसांत मुसळधार पाऊस झाला. यामुळे शहरातील रस्त्यांवर पाणी साचल्याने रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. शहरातील रस्त्यांवरील खड्डे बुजवले असून आता खड्डे नाहीत, असे महापालिकेच्या पथ विभागाकडून सांगण्यात आले होते. परंतु पावसामुळे रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. हे खड्डे बुजवता बुजवता महापालिकेला नाकीनऊ आले आहे. खड्ड्यांमुळे शहराच्या प्रत्येक भागात वाहतूक कोंडीमुळे नागरिकांचा श्वास कोंडला आहे. यामुळे पथ विभागाने शहरातील खड्डे बुजवण्याचे पुन्हा युद्ध पातळीवर हाती घेतले आहे.

शहरात शासकीय संस्थांमार्फत आणि पुणे महापालिकेच्या विविध खात्यांमार्फत पायाभूत सुविधा नागरिकांना पुरविण्यासाठी खोदाईची कामे हाती घेण्यात येतात. या कामांमुळे तसेच गेले अनेक दिवसांपासून सतत पडत असलेल्या पावसामुळे विविध डांबरी रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले होते. तसेच गेल्या दोन आठवड्यांपासून पावसाची दमदार हजेरी सुरूच आहे. रस्त्यांवर खड्डे बुजवण्याचे काम केले जात होते. मात्र पावसामुळे खड्डे बुजवण्यास मर्यादा येत होत्या. मात्र, मागच्या शनिवारी रात्री पाऊस न पडल्याने पथ विभागाने पडलेले खड्डे बुजवण्याची मोहीम पुन्हा हाती घेतली.

रस्त्यांवर पडलेले खड्डे आणि त्यावर करावयाचे पॅचवर्क या दोन्ही कामे युध्द पातळीवर केली आहेत. मुख्यत: काँक्रिटच्या माध्यमातून खड्डे बुजवण्यात येत आहे. पॅचवर्कसाठी देखील काँक्रिट वापरले जात आहे. तर खड्डे व पॅचवर्क हे डांबरी मालाच्या साहाय्याने बुजवण्यात आले. ज्या रस्त्यांवर अधिक प्रमाणात खड्डे पडलेले आहेत. रस्त्यांवर रिर्सेफेसिंगची कामे प्राधान्याने हाती घेण्यात आली आहेत.



### खड्ड्यांमुळे अपघातात नागरिकांचे जीव गेल्याने पथ विभागावर गुन्हा दाखल करण्याची मागणी

» महापालिकेच्या लेखी दोन हजारांवर खड्डे बुजवूनही वाहनचालकांना खड्ड्यांमधून रस्ता शोधत प्रवास करण्यासाठी कसरत करावी लागत आहेत. या प्रकारामुळे महापालिकेच्या पथ विभागाच्या कारभारावर पुणेकरांकडून संताप व्यक्त केला जात आहे. खड्डयात पडून अपघात होत असल्याने नागरिकांना जीव गमवावा लागत आहे. त्यामुळे पथ विभागावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली जाऊ लागली आहे.

> पावसामुळे रस्त्यांवर पडलेले खड्डेबुजवण्याचे काम पथ विभागाकडून युद्धपातळीवर सुरू आहे. आतापर्यंत २,०७८ खड्डे बुजवण्यात आले आहेत. २६५ ठिकाणी पॅचवर्क केले आहे. खड्डे असलेल्या रस्त्याची माहिती महापालिकेला देण्यात यावी. नागरिकांनी काळजी घ्यावी.
>
> **- अनिरुद्ध पावसकर, पथ विभागप्रमुख, पुणे महापालिका.**

> शहरातील रस्त्यांवर पडलेले खड्डे बुजवण्याचे निष्कृष्ट दर्जाचे काम महापालिकेने केले होते. पावसात त्याचे पितळ उघडे पडले. आता पुन्हा खड्डे बुजवण्याची घाई केली जात असली तरी कामातला दर्जा मात्र तसाच आहे. त्यामुळे बुजवलेले खड्डे पुन्हा उखडू लागले आहेत. खड्डयात पडून अपघात झालेल्यांना महापालिकेने नुकसान भरपाई द्यावी. तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल केला पाहिजे.
>
> **- आनंद रणधीर, संस्थापक-अध्यक्ष, सम्यक फाऊंडेशन.**

> रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांमुळे अपघात होत आहेत. यामध्ये काहींना जीव गमवावा लागतो. अनेकजण गंभीर जखमी होत आहेत. परंतु, या विरोधातील तक्रार पोलिसांत घेतली जात नाही. महापालिकेनेच कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि कंत्राटदार यांच्यावर गुन्हा दाखल केला पाहिजे. असा एक गुन्हा दाखल झाला तरी संपूर्ण व्यवस्थेला जरब बसेल. परंतु महापालिकेची इच्छाशक्तीच नाही, त्यामुळे असे काही होत नाही. दरवर्षीचे हे रडगाणे सुरूच आहे.
>
> **- विवेक वेलणकर, अध्यक्ष, सजग नागरिक मंच.**

# बारामतीत युगेंद्र पवारांची होणार एन्ट्री जयंत पाटलांनी दिले संकेत

## लोकसभा निवडणुकीत बारामती मतदारसंघ मोठ्या प्रमाणात चर्चेत आला होता आता बारामती विधानसभेसाठी पुन्हा एकदा पवारांच्या कुटुंबातच सामना रंगणार असल्याचे दिसत आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत बारामती मतदारसंघ मोठ्या प्रमाणात चर्चेत आला होता. कारण या ठिकाणी नणंद – भावजय यांच्यात लढत झाली होती. यामध्ये सुप्रिया सुळेंनी बाजी मारत बारामती लोकसभा जिंकली होती. यानंतर आता बारामती विधानसभेसाठी पुन्हा एकदा पवारांच्या कुटुंबातच सामना रंगणार असल्याचे दिसत आहे. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी तसे जाहीर संकेत दिले आहेत. या विधानसभा निवडणुकीत युगेंद्र पवार हे अजित पवार यांना आव्हान देण्याची शक्यता आहे.

तरुण नेतृत्वाला कसा पाठिंबा मिळू शकतो हे युगेंद्रदादांच्या रुपानं आपण गावागावांत बघतो. ते जिथं-जिथं जातायत, तिथं कार्यकर्ते उत्साहानं पुढं येत आहेत. सार्वजनिक जीवनात युगेंद्रदादांनी लक्ष घालायला सुरुवात केल्यापासून कार्यकर्तेही त्यांना साथ देत आहेत. बारामती विधानसभेचं भविष्य नव्या रक्ताकडे, नव्या हातात देण्याची उत्सुकता सर्वांना दिसेतय. हे कामही सगळे कार्यकर्ते योग्य पद्धतीनं करतील, असा विश्वास जयंत पाटील यांनी व्यक्त केला.

लोकसभा निवडणुकीत युगेंद्र यांनी सुप्रिया सुळे यांचा जोरदार प्रचार केला होता. निवडणुकीत बारामती विधानसभेत सुप्रिया सुळे यांना मोठी आघाडी मिळाली होती. तेव्हापासूनच युगेंद्र पवार यांचं नाव बारामती विधानसभेसाठी मोठ्या प्रमाणात चर्चेत आले होते.



### कोण आहेत युगेंद्र पवार?

» युगेंद्र पवार हे अजित पवार यांचे बंधू श्रीनिवास पवार यांचे चिरंजीव आहेत. शरद पवार यांनी स्थापन केलेल्या विद्या प्रतिष्ठान शिक्षण संस्थेचे ते खजिनदार आहेत. बारामती तालुका कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष आहेत. बारामतीमधील सामाजिक कार्यात ते सक्रिय आहेत. अजित पवार यांनी शरद पवार यांच्या विरोधात राजकीय भूमिका घेतल्यानंतर श्रीनिवास पवार आणि युगेंद्र पवार हे मोठ्या पवारांसोबत राहिले आहेत.

### काय म्हणाले जयंत पाटील?

» राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाची शिवस्वराज्य यात्रा सध्या राज्यात सुरू आहे. याच यात्रेचा भाग म्हणून बारामती इथं काल जाहीर सभा झाली. या सभेत बोलताना जयंत पाटील यांनी बारामती विधानसभा निवडणुकीच्या उमेदवारीवर अप्रत्यक्ष भाष्य केलं. बारामती विधानसभा निवडणूक युगेंद्र पवार हेच लढवतील असे संकेत त्यांनी यावेळी दिले. त्यांनी युगेंद्र पवारांचं कौतुक केलं. ‘युगेंद्र पवार हे अलीकडं राजकारणात रस घेऊ लागले आहेत. पवार साहेबांच्या लोकसभेच्या प्रचारापासून ते आता सगळीकडं फिरू लागले आहेत.

# ‘ड्रेनेज अलर्ट सिस्टीम’ प्रकल्पाला विशेष पुरस्कार

## पालिकेच्या इंद्रायणीनगर प्राथमिक शाळेतील सातवीच्या विद्यार्थ्यांच्या प्रकल्पाचे आंतरराष्ट्रीय स्पर्धेत कौतुक

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पाय जॅम फाऊंडेशन आणि कॅपजेमिनी यांच्या संयुक्त विद्यमाने मागील शैक्षणिक वर्षात मूलभूत संगणक व कोडिंग प्रशिक्षण घेण्यात आले होते. या प्रशिक्षणादरम्यान उत्कृष्ट कामगिरी केलेल्या ४४ शिक्षकांची मॉडेल शिक्षक म्हणून निवड करण्यात आली.



या मॉडेल शिक्षकांचा प्रमाणपत्र वाटप तसेच सन्मान समारंभ पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृह येथे पार पडला, याप्रसंगी आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, साहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, प्रशासन अधिकारी संगीता बांगर, पाय जॅम फाऊंडेशनचे संस्थापक शोएब दास, कॅपजेमिनी उद्योग समूहाच्या सीएसआर व्यवस्थापक धनश्री पांगे, साहाय्यक प्रशासन अधिकारी रझिया खान, उपशिक्षणाधिकारी बुधा नाडेकर तसेच शिक्षण विभागाचे अधिकारी, कर्मचारी आणि महापालिका शाळांचे शिक्षक उपस्थित होते.

यावेळी आयुक्त शेखर सिंह म्हणाले की, विद्यार्थ्यांना आजच्या आधुनिक जगाशी स्पर्धा करण्यासाठी आधी आधुनिक तंत्रज्ञानाशी मैत्री करावी लागेल. यातील महत्त्वाचा दुवा शिक्षक असून त्यासाठी शिक्षकांनीही आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. यासाठी महापालिकेने पाय जॅम फाऊंडेशनसोबत मिळून २१ व्या शतकातील आधुनिक कौशल्ये महापालिका शाळेतील शिक्षकांमध्ये तसेच विद्यार्थ्यांमध्ये विकसित करण्यासाठी विविध उपक्रम राबवले. या उपक्रमांतर्गत शिक्षकांना मूलभूत संगणक व कोडिंगचे प्रशिक्षण देण्यात आले. यातील ४४ मॉडेल शिक्षक महापालिका शाळेतील इतर शिक्षकांना संगणक तसेच कोडिंगचे प्रशिक्षण देतील ज्यामुळे महापालिका शाळेतील विद्यार्थी राज्य, राष्ट्रीय तसेच आंतराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक मिळविण्यासाठी सक्षम होतील, असेही ते म्हणाले.

या कार्यक्रमात महापालिका प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील मॉडेल शिक्षकांचा आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. त्यामध्ये जयश्री राऊत, शुभांगी वाजे, सुनीता पांढरकर, आदिनाथ कराड, संगीता कहाणे, प्रियांका सानप, सुनीता तिकोणे, रेश्मा पटेल, अलका पाटील, माधुरी शितोळे, मनीषा भिसे, मंजूषा अहिनवार, वर्षा सावंत, मुक्ता आसवले, नामदेव चव्हाण, दीपाली पाटील, उज्वला जाधव, संगीता शिंगोटे, अनिता शिंगाडे, निकिता कांबळे, करुणा परबत, मंगल शेळकांडे, क्षितिज शिंदे, मनीषा दरेकर, रंगनाथ गुंजाळ, मंदा पारधी, अंकुश लांडे, रंजना शिंदे, अर्चना भोईर, अश्विनी घुगे, संगीता कराड, मनीषा शिंदे, सविता गावडे, शबाना शेख, मंजूषा लोखंडे, अर्चना माने, नीलम वर्पे, संपदा काळे, वीणा दाभाडे, गीतांजली गाडेकर, विद्या पवार, अर्चना पाटील, ममता चंदनकर, सोनाली कुडले या शिक्षकांचा समावेश होता. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक साहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात यांनी केले, तर उपस्थितांचे आभार प्रशासन अधिकारी संगीता बांगर यांनी मानले.

### असे होते संगणक आणि कोडिंग प्रशिक्षण..

» मूलभूत संगणक व कोडिंग प्रशिक्षणामध्ये मुख्यत्वे ५ मॉड्यूलचा समावेश होता. या प्रशिक्षणात एकूण २०० शिक्षक सहभागी झाले होते पण त्यातील १३५ शिक्षक प्रमाणपत्रासाठी पात्र ठरले आहेत. प्रमाणपत्र मिळवण्यासाठी शिक्षकांसमोर संपूर्ण मोड्यूल पूर्ण करणे, विद्यार्थ्यांसोबत तास घेणे, विविध स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे, पाठ्यक्रमातील घटकांवर ॲनिमेशन बनवणे हे निकष ठेवण्यात आले होते. महापालिका शाळांमध्ये उपलब्ध असलेल्या डिजिटल साहित्याचा उपयोग मुलांच्या सर्जनशिलता, आधुनिक कौशल्ये यासाठी होणे गरजेचे आहे. त्यामुळे चालू शैक्षणिक वर्षाच्या शेवटपर्यंत प्रत्येक महापालिका शाळेतील किमान २ शिक्षक संगणक व २१ व्या शतकातील कौशल्यांनी समृद्ध असावेत, असे उद्दिष्ट शिक्षण विभागाने ठेवले आहे. त्यासाठी ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यामध्ये पुन्हा मूलभूत संगणक प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्यात येणार आहे. प्रशिक्षण कालावधी पूर्ण झाल्यानंतर त्यातील १० शिक्षकांची नेमणूक मास्टर ट्रेनर म्हणून केली जाणार असून हे मास्टर ट्रेनर्स शाळेतील शिक्षकांमध्ये व विद्यार्थ्यांना २१ व्या शतकातील आधुनिक कौशल्ये निरंतर रुजत राहतील यासाठी प्रयत्न करणार आहेत, अशी माहिती शिक्षण विभागाचे साहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात यांनी दिली.

# एमआयडीसीत असुविधांमुळे उद्योजक त्रस्त

## महापालिकेच्या सारथी ॲपवर केल्या तक्रारी : कचरा, खड्डे अन् विजेच्या खंडित पुरवठ्याने हैराण

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील एमआयडीसी परिसरात विविध समस्यांनी उद्योजक त्रस्त आहेत. कचरा, कंपनी परिसरात पडलेले खड्डे आणि वारंवार होणारा खंडित वीजपुरवठा यामुळे हैराण झाले आहे. याबाबत भोसरी परिसरातील एस ब्लॉकमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव असल्याने त्याची तक्रार पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सारथी ॲपवर केली आहे. एमआयडी कार्यालय यांच्याकडून रस्ता आणि इतर सोयीसुविधांबाबत महापालिकेकडे बोट दाखवत आहे.

भोसरी एमआयडीसी नावाजलेल्या परिसरातील रस्त्यांवर पडलेला राडारोडा व कचऱ्याने व्यापून गेला आहे. एस ब्लॉकमधील रस्त्यांची दुरवस्था झाली असून मोठे- मोठे खड्डे पडल्याने यामध्ये पाणी साचत असल्याने येथून ये-जा करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. एमआयडीसीत भोसरीतील एस ब्लॉकमध्ये ३० फुटांच्या रस्त्यावर कंपनीच्या समोरील बाजूस दररोज कचरा मोठ्या प्रमाणात टाकला जातो. तसेच, नेहरुनगर ते भोसरी रस्ता या ठिकाणीही मोठ्या प्रमाणावर रस्त्याची दुरवस्था झाली आहे. भोसरी एमआयडीसीतील नावाजलेल्या परिसरातील रस्त्यांवर पडलेला राडारोडा, कचऱ्याने व्यापून गेला आहे.



कचरा हॉटेलचा व कंपन्यांचा असल्याचे सांगण्यात येते. या कचऱ्यामुळे कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. बरेच कर्मचारी ताप, अंगदुखी व चिकुनगुन्या यासारख्या साथीच्या रोगाने त्रस्त आहेत. कंपनीसमोर अक्षरशः कचऱ्याचे डंम्पिंग ग्राउंड झाले आहे. कंपनीसमोरील रस्त्यांवर कचरा पसरला आहे. त्यामुळे येथून ये-जा करणाऱ्यांना दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत. रस्त्यावरील खडीमुळे अपघात होण्याची दाट शक्यता आहे.

काही दिवसांपूर्वी एमआयडीसी परिसरात खोदकाम केले. पुन्हा तो रस्ता व्यवस्थित बुजवला गेला नाही. त्यात पावसामुळे आणखी दुरवस्था झाली आहे. राडारोडा मोठ्या प्रमाणात रस्त्याच्या कडेला पसरला आहे. याबाबत उद्योजकांनी सारथीवर तक्रार करूनही महापालिकेने तक्रार निवारणासंदर्भात कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.

काही वेळा सारथीवर तक्रार केल्यावर अधिकारी पाहणी न करता व काम पूर्ण न करता तक्रार बंद करतात असे सांगितले. सर्व उद्योजक राडारोडा व कचरा ताबडतोब उचलण्याची मागणी करीत आहेत. रस्त्यावरील खड्डे बुजवावेत, अशी मागणी परिसरातील उद्योजक, कर्मचाऱ्यांतून जात आहे.

> “ एमआयडीसी परिसरात जाताना मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. रात्री-अपरात्री प्रवास करणाऱ्या कामगारांना अपघाताचा धोका आहे. त्याचप्रमाणे एमआयडीसीने या सुविधा देण्याची जबाबदारी महापालिकेची असल्याचे सांगून हात वर केले आहेत. त्यामुळे उद्योजकांनी तक्रार कुठे करायची, असा प्रश्न पडला आहे.
>
> - रणजीत डेंगाळे, उद्योजक.

# हिंजवडी 'आयटी' नव्हे, 'खड्डा पार्क'!

## लाडका भाऊ, लाडकी बहीण, आम्ही कधी होणार लाडके, विचारतोय कर देणारा आयटी इंजिनीअर!

**पुणे | प्रतिनिधी**

हिंजवडीतील माहिती तंत्रज्ञान अर्थात आयटी पार्कची ओळख आता 'खड्डा पार्क' अशी बनली आहे. येथील रस्त्यांची खड्ड्यांमुळे चाळण झाली असून, वाहतूक कोंडी होऊन वाहनचालकांचे रोज हाल सुरू आहेत. ही कोंडी सोडविण्याऐवजी शासकीय यंत्रणांकडून केवळ तात्पुरती मलमपट्टी करण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे ही समस्या सुटण्याऐवजी आणखी बिकट बनत आहे.

हिंजवडीतील राजीव गांधी इन्फोटेक पार्कमध्ये जगातील आणि देशांतील मोठ्या आयटी कंपन्यांची कार्यालये आहेत. या पार्कमध्ये एकूण २०० आयटी कंपन्या कार्यरत असून, तीन लाखांहून अधिक कर्मचारी काम करतात. गेल्या काही दिवसांपासून या पार्कमधील अपुऱ्या पायाभूत सुविधा आणि वाहतूक कोंडीचा मुद्दा चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. आता या पार्कमधील खड्डेमय रस्त्यांमुळे येथील पायाभूत सुविधांचा झालेला बोजवारा समोर आला आहे. खराब रस्त्यांमुळे वाहतूक कोंडी होऊन वाहनचालक रोज एक ते दीड तास कोंडीत अडकून पडत आहेत.



आयटी पार्कमधील कंपन्यांत काम करणारे आयटीयन्स वारंवार येथील खराब रस्त्यांचा मुद्दा समाज माध्यमातून मांडत आहेत. आयटी पार्कमध्ये केवळ ३ किलोमीटरच्या प्रवासाला ३० मिनिटांहून अधिक वेळ लागत आहे. योग्य पदपथ नसल्याने चालणे शक्य नाही. तसेच, सायकल तर चालविणे अशक्य असल्याच्या प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. हिंजवडीतील खराब रस्त्यांमुळे कार्यालयात पोहोचण्यास उशीर होतो. आयटी कंपन्या सरकारकडे पाठपुरावा करून या परिस्थितीत बदल घडवू शकतात का, असा प्रश्नही अनेक जण उपस्थित करीत आहेत.

### 'एमआयडीसी'चे 'पीएमआरडीए'कडे बोट

» हिंडवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गिकेचे काम हिंजवडीतील काही रस्त्यांवर सुरू आहे. या रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (पीएमआरडीए) पत्र पाठवून कान टोचले आहेत. या पत्रात म्हटले आहे, की मेट्रो मार्गिकेखालील रस्त्यांची सध्याच्या पावसात दयनीय अवस्था झाली आहे. त्यामुळे नागरिकांच्या रोषास आम्हाला सामोरे जावे लागत आहे. हिंजवडीतील रस्त्यांवर मेट्रो मार्गिका उभारण्यास परवानगी देताना हे रस्ते पूर्ववत करण्याची जबाबदारी 'पीएमआरडीए'कडे देण्यात आली. त्यामुळे हे रस्ते तातडीने पूर्ववत करावेत, जेणेकरून नागरिकांचा प्रवास सुखकर होईल.

" आयटी पार्कमधील रस्त्यांवरील खड्डे तात्पुरते बुजविण्यात येत आहेत. हे रस्ते दुरुस्तीनंतर दोन दिवसांत पुन्हा उखडत आहेत. पावसामुळे काम करता येत नसल्याचे यंत्रणांचे म्हणणे आहे. पावसाळ्यापूर्वी काम केले असते, तर ही वेळ आली नसती. हिंजवडीत नागरी समस्या कायम असून, त्या सोडविण्यासाठी शासकीय यंत्रणांनी अद्याप पावले उचललेली नाहीत.

**- लेफ्टनन्ट कर्नल (निवृत्त) योगेश जोशी, सचिव, हिंजवडी इंडस्ट्रीज असोसिएशन.**

# कमला नेहरू हॉस्पिटलचेच आरोग्य धोक्यात

## इमारतीच्या पार्किंगमध्ये ड्रेनेज लाइनमधून मैलापाणी मोठ्या प्रमाणात जमा

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेचे शहरातील एकमेव मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल कमला नेहरू हॉस्पिटल आहे. कोट्यवधी रुपये खर्च करून नवीन इमारत बांधण्यात आली आहे. मात्र, या इमारतीच्या पार्किंगमध्ये ड्रेनेज लाइनमधून मैलापाणी मोठ्या प्रमाणात जमा होत आहे. तसेच, येथील अस्वच्छता, त्यामुळे तत्काळ कार्यवाही केली नाही तर येथील घाणपाणी आयुक्तांच्या केबिनमध्ये ओतण्याचा इशारा आम आदमी पार्टीने दिला आहे.




आम आदमी पार्टीच्या शिष्टमंडळाने नुकतीच कमला नेहरु रुग्णालयाच्या झालेल्या दुरवस्थेची पाहणी केली. यावेळी शहराध्यक्ष सुदर्शन जगदाळे, महासचिव सतीश यादव, उपाध्यक्ष अनिल कोंढाळकर, मीडिया सहसंयोजक निरंजन अडागळे, युवा आघाडी सहसचिव ॲड. गुणाजी मोरे, शंकर थोरात, बालाजी कंठेकर उपस्थित होते.

यावेळी जगदाळे यांनी रुग्णालयातील प्रशासकीय अधिकाऱ्यांची भेट घेतली. मात्र, त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारचे समाधानकारक उत्तर मिळाले नाही. प्रशासनाच्या चुकीच्या कारभारामुळे नागरिकांचे जीव धोक्यात आले आहेत.

झिका, डेंग्यू, मलेरिया सारखे आजार पसरण्याची खूप मोठी भीती निर्माण झाली आहे. महापालिका प्रशासन काही जीवितहानी झाल्यावर जागी होणार का? हा प्रश्न निरंजन अडागळे आणि ॲड. गुणाजी मोरे यांनी व्यक्त केले.

### बेसमेंटमध्ये साचतेय पावसाचे पाणी...

ड्रेनेज लाइनमधून बाहेर पडणारे मैलापाणी हे बेसमेंटमध्ये जमा होत आहे. त्याचा निचरा होत नसल्याचे चित्र आहे. परिणामी, हॉस्पिटलच्या नवीन इमारतीतील बेसमेंटमध्ये दुर्गंधी तसेच डासांची पैदास वाढली आहे. याचा परिणाम रुग्णालयात उपचार घेण्यासाठी आलेल्या रुग्णांच्या आरोग्यावर होत आहे. अशातच पावसाचे पाणी देखील या बेसमेंटमध्ये साठले जात आहे. हे पाणी काढण्यासाठी पंपाचा वापर करावा लागत असून चुकीच्या पद्धतीने बांधकाम करण्याचे हे एक उत्तम उदाहरण आहे.